# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### गावनिहाय आपत्ती व्यवस्थापन आराखड्याबाबत.

**(१) ४७६ (२०-०४-२०१७) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापूर, भुकंप, दरड कोसळणे व इतर नैसर्गिक आपत्तीच्या काळात तातडीने मदत कार्य सुरुवात करता यावे यासाठी गाव निहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे आदेश राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागातर्फे सन २०१४ दरम्यान सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी हिंगोलीसह मराठवाड्यातील गावांसाठी गाव निहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या आराखड्यात थोडक्यात माहिती काय आहे ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२२-०९-२०२१) :** (१), (२) व (३) महापूर, भुकंप, दरड कोसळणे व इतर नैसर्गिक आपत्तीच्या काळात तातडीने मदत कार्य सुरुवात करता यावे यासाठी गाव निहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे तोंडी निर्देश देण्यात आलेले आहेत.

गाव निहाय आपत्ती व्यवस्थापन आराखड्यामध्ये आपत्तीचा पूर्व इतिहास, आपत्ती निहाय प्रवणला आपत्तीचे हंगामी वेळापत्रक, पूर प्रवणता, शेध व सूटका गट, प्रथमोपचार गट, निवारा व्यवस्था गट संपर्क क्रमांक इ. माहिती समावेश करण्यात आला आहे.

---

## राज्यातील नोंदीत बांधकाम कामगारांना योजनांचा लाभ मिळण्याबाबत

**(२) २०६७ (१८-०३-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.संजय दौंड, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अधिसुचनेनुसार बांधकाम प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या १ टक्के (जमिनीचे मुल्य वगळता) इतकी रक्कम बांधकाम व्यावसायिकांकडून उपकराच्या स्वरुपात घेतली जात असून सद्य:स्थितीत ८ हजार २०७ कोटी इतका निधी बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे जमा झाला असून सदर निधीचा राज्यातील नोंदणीकृत इमारत बांधकाम कामगारांना लाभ मिळाला नसल्याची बाब दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा सदोष कारभार व कामगार नोंंदणी करण्यासाठी कर्मचारी नसल्यामुळे गेल्या पाच वर्षात कामगारांच्या नोंदीही प्रलंबित असल्याने सन २०१६ पासून कामगारांच्या पाल्यांस रुपये अडीच व पाच हजार शैक्षणिक सहाय्य, कामगारांचा मृत्यू झाल्यास अत्यंविधीसाठी मदत, वारसास रुपये ५ लाख सहाय्य इत्यादी योजनांचा लाभ बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियास मिळत नसल्याच्या तक्रारी समपर्ण मजदूर संघ, अहमदनगर तसेच राज्यातील विविध बांधकाम कामगार संघटनांकडून शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असंघटीत कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा म्हणून शासनाने कल्याणकारी मंडळाची स्थापना केली असून योजनेच्या अटी व नियमानुसार असंघटीत कामगारांनी स्थानिक कामगार कार्यालयाकडे गेल्या आठ महिन्यापूर्वीच नोंदणी करुनही त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळाला नसल्याने या प्रकरणी सदर असंघटीत कामगारांच्या गुरुदेव युवा संघ या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना भेटून तसे निवेदन दिल्यावर, जिल्हाधिकारी यांनी आठ दिवसात सर्व कामगारांना लाभ मिळवून देण्याचे आश्वासन देऊनही कोणताही लाभ कामगारांना देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार लाभार्थ्यांच्या प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी तसेच कामगार नोंदणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

मंडळाकडे दिनांक १/०४/२०१८ ते दिनांक ३१/०१/२०२० पर्यंत रुपये ८७५२.०८ कोटी उपकर जमा झालेला असून सदर उपकर निधीतून नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

तथापि, समर्पण मजदूर संघ या संघटनेने या कार्यालयात बाद झालेल्या कामगारांची नोंदणी पुर्नजिवित करणे, गहाळ झालेल्या ओळखपत्राची दुय्यम प्रत मिळणेबाबत, नोंदणीकरीता तालुकास्तरावर कॅम्प लावणेबाबत, अत्यावश्यक सुरक्षासंचाचे वाटपाबाबत तालुकास्तरावर कॅम्पचे आयोजन करणे इत्यादी कारणासाठी लेखी पत्र सादर केलेली आहेत व त्यावर वेळोवेळी कार्यवाही झालेली आहे.

अहमदनगर जिल्हयात रुपये २५००/- व रुपये ५०००/- या शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेसाठी एकूण २७ नोंदित बांधकाम कामगार लाभार्थींकडून अर्ज प्राप्त झाले असून त्यांच्या बचत खात्यावर अनुज्ञेय रक्कम वर्ग करण्यात आलेली आहे.

कामगाराचा मृत्यू झाल्यास अंत्यविधीसाठी मदत या योजनेंतर्गत २१ अर्ज प्राप्त झाले असून अर्जामध्ये आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

कामगाराचा कामावर असताना अपघाती मृत्यू झाल्यास वारसांना रुपये ५.०० लाख इतके अर्थसहाय्य देण्याच्या योजनेंतर्गत ४ अर्ज प्राप्त झाले असून १ अर्जदार अपात्र ठरला असून उर्वरित ३ अर्जदाराची पात्रता तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०२० मध्ये यवतमाळ जिल्ह्यात मंडळांतर्गत नोंदित २१०५० बांधकाम कामगार लाभार्थ्यांना रुपये २०००/- प्रमाणे तसेच १९३८५ बांधकाम कामगार लाभार्थ्यांना रुपये ३०००/- व २००७१ बांधकाम कामगार लाभार्थ्यांना रुपये १५००/- प्रमाणे त्यांच्या थेट बँक खात्यात अर्थसहाय्य जमा करण्यात आलेले आहे.

मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी सुरु असून आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करुन अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदित २३१० घरेलू कामगारांना रुपये १५००/- प्रमाणे त्यांच्या थेट बँक खात्यात अर्थसहाय्य जमा करण्यात आलेले आहे.

कामगार आयुक्त कार्यालय, यवतमाळ यांनी अध्यक्ष, गुरुदेव युवा संघ, यवतमाळ यांना कोरोना प्रादुर्भाव काळातील अनुदान वाटपाबाबत दिनांक २०/०७/२०२१ रोजीच्या पत्राने कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यात रुग्णांच्या उपचारासाठी निर्धारित केलेल्या दरापेक्षा जादा दर आकारणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत

**(३) ३८६५ (१७-०७-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना-१९ विषाणूच्या संसर्गाच्या कालावधीत शासनाने रुग्णांच्या उपचारासाठी खाजगी रुग्णालयांना दर निर्धारित केलेले असतानाही खाजगी रुग्णालयाकडून सर्वसामान्य रुग्णांच्या उपचारापोटी जादा दर आकारले जात असून तसेच रुग्णाकरीता राखीव खाटा ठेवण्यासह पीपीईच्या निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जादा दर आकारणी करुन रुग्णांची आर्थिक लूट केली जात असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील भाटिया रुग्णालयामध्ये छातीत दुखत असल्याने दाखल झालेल्या रुग्णाच्या कुटुंबियांची संमती न घेता अँजिओप्लास्टी करुन रुपये ४,७०,०००/ चे बील आकारण्यात आले, तर कुर्ला येथील खाजगी रुग्णालयामध्ये कोरोनाच्या वैद्यकीय उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या रुग्णाचे २१ दिवसाचे रुपये १०,५०,०००/- बील आकारण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धर्मदाय ट्रस्ट तर्फे चालवण्यात येणाऱ्या विद्याविहार (मुंबई) येथील रुग्णालयाने आर्थिकदृष्टया मागास करोना बाधित रुग्णाकडून उपचार खर्च रुपये १० लाखाचे बील आकारल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा रुग्णाकडून उपचारापोटी वाढीव दर आकारणाऱ्या खाजगी रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२९-०९-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

प्राप्त अहवालानुसार सदर रुग्ण भाटीया रुग्णालयातील अतिदक्षता विभागात अत्यवस्थ अवस्थेत दाखल झाला होता.त्याच्यावर अँजियोप्लास्टी करण्यात आली होती. कोरोनाचा प्रार्दुभाव असल्यामुळे कुटुंबाची मौखिक संमती घेण्यात आली. सदर बिलावर एक लाख रुपयांची सूट देण्यात आल्याचे कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) कोवीड बाधित रुग्णांवर उपचारासाठी खाजगी रुग्णालयाकडून आकारण्यात येणाऱ्या दराचे नियंत्रण शासन अधिसूचना दिनांक २१/०५/२०२० व दिनांक ३१/०८/२०२० नुसार करण्यात आले आहे. याशिवाय देयक तपासणीसाठी लेखा परिक्षक व भरारी पथक नेमण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दिनांक ३१/०८/२०२० च्या अधिसूचनेनुसार पूर्व लेखा परिक्षीत देयक देणे. अतिरिक्त देयक आकारल्यास, अतिरिक्त रक्कमेची रुग्णांना परतफेड करणे अन्यथा संबंधित रुग्णालयावर फौजदारी कारवाईचे प्रावधान करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माडखोल (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावात मागील ३ महिन्यांपासून वीज पुरवठा सुरळीत नसल्याबाबत

**(४) ४६१४ (१७-०७-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माडखोल (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावात मागील ३ महिन्यांपासून वीज पुरवठा सुरळीत नसून संपूर्ण गांव विजेअभावी वारंवार अंधारात रहात असून विजेसंदर्भात सहाय्यक अभियंता, महावितरण महामंडळ, सावंतवाडी

यांचेकडे तक्रार करुनही त्याकडे दुर्लक्ष व विलंब होत असल्याने ग्रामस्थांनी दिनांक २२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास सहाय्यक अभियंता, महावितरण महामंडळ, सावंतवाडी यांना घेराव घातला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिकारी गावात नसतात व वायरमनकडून योग्य उत्तरे मिळत नसल्याने तात्काळ पाठपुरावा न केल्यास जन आंदोलन करण्यात येईल असा ईशारा ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषगांने माडखोल (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावाचा वीजपुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०८-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) मान्सूनपूर्व कालावधीमधील आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे तसेच मुसळधार पावसामध्ये खंडीत वीज पुरवठा सुरळित करण्यासाठी प्राथमिकता देऊन, ग्राहकांच्या वीज तक्रारींचे निवारण करण्याकरीता अधिकारी/कर्मचारी यांना कार्यक्षेत्रात कार्यालयाच्या बाहेर नेहमीच जावे लागते. तक्रारीचे निवारण करतांना किंवा प्रवासामध्ये दुर्गम परिसरात अनेकदा दुरध्वनी नेटवर्क उपलब्ध नसल्यामुळे ग्राहकाच्या दुरध्वनीद्वारे प्राप्त तक्रारीस प्रतिसाद देण्यास किंवा समाधान करतांना विलंब होण्यामुळे ग्रामस्थांकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला.
(३) माहे जून, २०२० मध्ये निसर्ग चक्रीवादळामुळे प्रभावीत झालेला माडखोल ता.सावंतवाडी जिल्हा सिंधूदूर्ग या गावाचा वीज पुरवठा तातडीने सुरळीत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे रेवली (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे योजना निधी अभावी अपूर्ण असल्याबाबत

**(५) ५३१९ (१७-११-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रेवली (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे योजना निधी अभावी अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मौजे रेवली येथील लघुपाटबंधारे योजनेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (०४-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) या प्रकल्पाचे काम जानेवारी, २०१० मध्ये सुरु करण्यात आले. सन २०१० ते २०१३ पर्यंत योजनेचे काम प्रगतीपथावर होते. भूसंपादनाची रक्कम प्राप्त न झाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी योजनेचे काम जून २०१३ पासून रोखून ठेवले होते. मौजे रेवली गावाचा रुपये ९.६५ कोटीचा अंतिम निवाडा सन २०१४ मध्ये जाहीर झालेला असून रुपये १.६४ कोटी उप विभागीय अधिकारी, दापोली कार्यालयात जमा करुन संबंधित खातेदारांना वाटप करण्यात आले. तसेच मौजे वेळवी गावाचा अंतिम निवाडा जाहीर होण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये असून त्याप्रकरणी रुपये ०.०८ कोटी उप विभागीय अधिकारी, दापोली कार्यालयात जमा केल्याने प्रकल्पग्रस्तांनी योजनेचे काम सुरु करण्यास संमती दिली आहे. योजनेचे उर्वरित काम जानेवारी २०१९ मध्ये सुरु करण्यात येवून काम ७० टक्के पूर्ण झाले आहे.

सदर योजनेच्या कामासाठी रुपये २३३९.७१ लक्ष खर्च झालेला असून त्यापैकी भूसंपादनासाठी रुपये १७२.०० लक्ष निधी खर्च झालेला आहे. भूसंपदानाकरीता रुपये ८.५० कोटी निधी सन २०२१-२२ करीता उपलब्ध होणाऱ्या निधीमधून निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्याचे व प्रकल्पाची उर्वरित कामे मे, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वणंद (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर स्मारक इमारतीचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(६) ५३३३ (१४-१२-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणंद (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर स्मारक इमारतीचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंती वर्षानिमित्त वणंद ता.दापोली, जि.रत्नागिरी (माता रमाई यांचे जन्मस्थान) येथील ऐतिहासिक स्थळाचा विकास करणेकरीता विभागाच्या दिनांक ०१/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) येथील ग्रामीण शहरातील उत्तरशिव नदीतील पाणी दूषित झाल्याबाबत

**(७) ५४१९ (१८-११-२०२०) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील ग्रामीण शहरातील उत्तरशिव नदीत मोठ्या प्रमाणात केमिकल मिसळल्याने नदीतील पाणी दूषित होवून जनावरे मृत्यू पावल्याने शेतकऱ्यांच्या मनात भिती निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील १४ गाव परिसर नदीकाठचा भाग असून या ठिकाणी असलेल्या अनेक गोडावूनमध्ये कंपनीला लागणाऱ्या केमिकलची साठवणूक करून ठेवली जाते व अनावश्यक किंवा प्रक्रिया झाल्यानंतरचे केमिकल रात्रीच्या अंधारात नदीत सोडले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नद्यांच्या स्वच्छतेकडे शासनाने भर दिला आहे परंतु दिवसेंदिवस उत्तरशिव नदीपात्र प्रदूषित करण्याचे काम सदरहू कंपन्यांकडून करण्यात येत असून याच नदीपात्रातील पाणी शेतकरी गुरांसाठी व फळबागांसाठी वापरत असल्यामुळे जनावरांच्या व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार उत्तरशिव नदीतील प्रदूषण रोखण्याकरीता कार्यवाही करुन यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२४-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही. तथापि, प्रश्नाधिन विषयाबाबतचे वृत्त दिनांक २६/०७/२०२० रोजी सामाजिक माध्यमांवर प्रसिध्द झाले होते.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सामाजिक माध्यमांवर प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २७/०७/२०२० रोजी केलेल्या पाहणीदरम्यान प्रश्नामध्ये नमूद उत्तरशिव पावसाळी नाल्याच्या पाण्यामध्ये रसायनाचा रंग आढळून आला नव्हता.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत हद्दीमध्ये नविन इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर पाण्याचे पुनर्भरण करण्याबाबत

**(८) ५४९७ (१४-१२-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत हद्दीमध्ये नविन इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर पाण्याचे पुनर्भरण करण्याबाबत नगरपरिषद व नगरपंचायत प्रशासन दिरंगाई व टाळाटाळ करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०९-२०२१) :** (१) व (२) जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत हद्दीमध्ये नवीन इमारतीकरीता बांधकाम परवानगी देतांना पाण्याचे पुर्नभरण करण्याच्या अटीचा उल्लेख करुनच बांधकाम परवानगी दिली जाते. तसेच, बांधकाम झाल्यानंतर पाण्याचे पुर्नभरण केल्याबाबत खात्री केल्यानंतरच भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत असल्याचे नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी, कार्यालय, रत्नागिरी यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील काळवीटांच्या अधिवासावर आक्रमण झाल्याबाबत

**(९) ५६२४ (१४-१२-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात काळवीटांच्या संवर्धनासाठी काही क्षेत्र शासनाने संरक्षित केले असून काळवीटांचा अधिवास असलेल्या क्षेत्रामध्ये मानवी वस्त्यांचे अतिक्रमण होऊन सन २०१९-२०२० मध्ये १५० ते १७५ काळवीटांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काळवीटांच्या संरक्षित क्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्याना संरक्षक कुंपण नसल्याने वाहनांच्या आपघाताने काळवीटांचे मृत्यू होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काळवीटांच्या संरक्षणासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.

काळवीटांच्या संरक्षण व संवर्धनासाठी राज्यात कारंजा सोहळ अभयारण्य, रेहेकुरी अभयारण्य तसेच ममदापूर संवर्धन राखीव ही क्षेत्र संरक्षित करण्यात आली आहे.

सदर क्षेत्रात मानवी वस्त्यांचे अतिक्रमण झालेले नाही. तथापि, ममदापूर येथे कुत्र्याच्या हल्ल्यात १ (मादी) काळवीटाचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(२) राज्यात काळवीटांच्या संरक्षण व संवर्धनासाठी घोषित करण्यात आलेल्या संरक्षित क्षेत्रातुन जाणाऱ्या रस्त्यांना संरक्षण कुंपण करण्यात आलेले नाही. तथापि, धुळे वनवृत्तात सन २०१९-२०२० १ तर अमरावती वनवृत्तात ९ असे एकूण १० काळवीटांचा रस्ते अपघातात मृत्यू झालेला आहे.

(३) राज्यात वन्यप्राण्यांच्या संरक्षणार्थ क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- नियमित गस्तीव्दारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण करण्यात येते. याकरीता अत्याधुनिक साधनसामुग्री जसे बिनतारी संदेश यंत्रणा, कॅमेरा ट्रॅप, जीपीएस, पीडीए यांचा वापर करण्यात येतो.
- वन्यप्राण्यांचे रस्ते अपघातामुळे होणारे मृत्यू टाळण्यासाठी वनक्षेत्रातुन जाणाऱ्या व वनक्षेत्राला लागुन असलेल्या रस्त्यांवर सावधानीबाबत माहिती फलक लावण्यात आले आहेत.
- संरक्षित क्षेत्राबाहेरील वनांलगत रस्त्यांवर प्रत्येक २ कि.मी. अंतरावर वन्यजीव संरक्षणार्थ उपशमन योजना राबण्याविणे आवश्यक करण्यात आले आहे.

- ज्या भागात वाघाचे/ बिबटयाचे संघर्षाची स्थिती निर्माण होते, त्याठिकाणी जंगलात न जाण्याबाबत सावधानतेचा इशारा दर्शक पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत व आवश्यक ठिकाणी जलद प्रतिसाद चमु गठीत करण्यात आलेली आहे.
- वन्यप्राण्यांसाठी जंगलात पाण्याचे स्त्रोत (पाणवठे, सिमेंट प्लग बंधारे, वनतलाव इ.) निर्माण करण्यात येतात.
- ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत गावातील कुटूंबांना एलपीजी गॅस पुरवठा करण्यात येत आहे.
- महत्वाच्या ठिकाणी तपासणी नाके, संरक्षण कुट्या उभारण्यात आलेले असून वनकर्मचारी रात्र-दिवस गस्त करतात. तसेच श्वानपथक निर्माण करुन त्याचा उपयोग करण्यात येतो.
- विद्युत प्रवाहाव्दारे होणाऱ्या शिकारीच्या घटनांवर सनियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने विद्युत वितरण कंपनीच्या स्थानिक अधिकाऱ्यांना संयुक्त सभेत पाचारण करण्यात येते.
- तसेच शेतालगत विद्युत प्रवाह सोडल्यामुळे किंवा विद्युत प्रवाहाच्या सहाय्याने वन्य प्राण्यांची शिकार करणाऱ्यांवर वनविभाग व विद्युत विभागाचे कायदयानुसार दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल याबाबत गावागावात सभा घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राणी शिकार अथवा वनगुन्हयासंबधी माहिती जलद प्राप्त होण्यासाठी वनविभागाची हेल्प लाईन टोल फ्रि क्रमांक १९२६ कार्यान्वित करण्यात आली आहे.
- प्रत्येक पाणवठ्याची वनमजुर/ वनरक्षकांमार्फत पाणवठ्यातील पाण्याची व सभोवतालच्या परिसराची नियमित तपासणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विनाअनुदानित शाळांना मोफत पाठयपुस्तके योजना लागू करण्याबाबत

**(१०) ५६३० (१३-१२-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित शाळांना मध्यान्ह भोजन, मोफत पाठयपुस्तके योजना लागू नसल्यामुळे सदरहू शाळांनाही सदरील योजना लागू कराव्यात अशी मागणी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील शाळांना उपरोक्त योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०९-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शालेय पोषण आहार योजना तसेच मोफत पाठ्यपुस्तक योजनांसाठी राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील इ. १ली ते इ. ८वी पर्यंतचे विद्यार्थी लाभार्थी आहेत. केंद्र शासनाच्या निकषानुसार विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थी सदर योजनांच्या लाभास पात्र नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूमिगत विद्युत प्रणाली प्रकल्पामध्ये वरसोली गावाचा समावेश करण्याबाबत

**(११) ५६४९ (१४-१२-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरसोली (ता.अलिबाग, जि.रायगड) हे गाव समुद्र किनारी असल्यामुळे वादळ वाऱ्याचा नेहमीच या गावाला सामना करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत भूमिगत विद्युत प्रणाली प्रकल्पामध्ये वरसोली गावाचा सुमारे ५ ते १० टक्के भाग समाविष्ट करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जी गावे समुद्र किनारी आहेत त्या गावांना चक्रीवादळासह वादळीवाऱ्याचा नेहमीच सामना करावा लागतो अशा गावांचा सदर प्रकल्पामध्ये संपूर्ण समाविष्ट करून १०० टक्के भूमिगत वाहिन्याचे काम करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समुद्र किनारी असलेले वरसोली गाव सदर प्रकल्पामध्ये १०० टक्के समाविष्ट करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०८-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत चक्रीवादळाचा सामना कराव्या लागणाऱ्या ६ गाव/शहरामध्ये वरसोली गावातील एकूण २० पैकी १० रोहित्राच्या लघुदाब व उच्चदाब वाहिन्या भूमिगत करण्याबाबत कार्यादेश देण्यात आले असून उर्वरित गावाकरीता अतिरिक्त प्रस्ताव महावितरणद्वारे शासनास सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठावाडा विभागाचा अनुषेश भरणेबाबत

**(१२) ५७७८ (१४-१२-२०२०) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागात अद्यापही शैक्षणिक, आर्थिक, सामाजिकदृष्टया मागास असून मराठवाडा विभागाचा अनुशेष पूर्ण झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाडा विभागाचा अनुशेष भरण्याबाबत कोणत्या उपाययोजना राबविण्यात आल्या वा येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२४-०९-२०२१) :** (१) व (२) "निर्देशांक व अनुशेष समिती" ने ३१ मार्च, १९९४ अखेरचा विकास मंडळ निहाय व विकास क्षेत्रनिहाय दर्शविलेला एकूण रुपये १४००६.७७ कोटी अनुशेष निश्चित केला होता.त्यापैकी, मराठवाडा विकास मंडळ क्षेत्राच्या रुपये ४००४.५५ कोटीच्या अनुशेषाचे निर्मुलन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुसूर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) शिवारातील गांधारी नदीवरील सिमेंट बंधारा वाहून गेल्याबाबत

**(१३) ५८६६ (१४-११-२०२०) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुसूर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) शिवारातील गांधारी नदीवर शासनाने सहा महिन्यांपुर्वी सिमेंट बंधारा बांधला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्यासाठी रुपये २० लाख इतका खर्च झाला असून सदर बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने सन २०२० मध्ये पडलेल्या पहिल्या पावसाच्या पाण्यात बंधारा वाहून गेल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, उपविभागीय अधिकारी तसेच तहसिलदार, कन्नड यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (२३-०८-२०२१) :** (१) होय.

जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत हे काम मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद अंतर्गत मृद व जलसंधारण उपविभाग, कन्नड मार्फत सन २०१९ मध्ये पूर्ण झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०२० मध्ये कन्नड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर सिमेंट बंधारा वाहून गेलेला नसून क्षतीग्रस्त झालेला आहे.

(३) होय.

मृद व जलसंधारण उपविभाग, कन्नड यांचेकडे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) कन्नड उपविभाग कार्यालयाकडून दिनांक २७/७/२०२० च्या पत्रान्वये संबंधित कंत्राटदारास सदर बंधाऱ्याची दुरूस्ती करून देण्याबाबत कळविण्यात आले आहे. संबंधित कंत्राटदाराने गांधारी नदीतील पाणी कमी झाल्यानंतर दुरूस्ती करून देण्याचे मान्य केले आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील दहा वर्षीय मुलावर बिबटयाने हल्ला करून ठार केल्याबाबत

**(१४) ६०४६ (१४-१२-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालुका उत्तर वनपरिक्षेत्रांतर्गत चिचगांव कक्ष क्र.१०१० मध्ये दहा वर्षीय मुलावर बिबटयाने हल्ला करून ठार केल्याची घटना घडल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मृत मुलाच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-०६-२०२१) :** (१) व (२) दिनांक ०१/१०/२०२० रोजी बिबट या वन्यप्राण्याच्या हल्ल्यात नैतीक संतोष कुथे रा. वांद्रा वय वर्ष ११ यांचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महानगरपालिका व नगरपरिषदांना DPR ची देयके अदा करण्याबाबत

**(१५) ६३३८ (०२-०२-२०२१) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध महानगरपालिकांतर्गत रस्ते विकासाचा DPR जगप्रयाग इन्फ्रा स्ट्रक्चर प्रा.लि., लातुर यांनी तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: अमरावती, हिंगोली, लातूर, कर्जत, तुळजापूर, औरंगाबाद, अहमदनगर, गेवराई, वसई-विरार, डहाणू व उदगीर येथील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायत अंतर्गत रस्ते विकासाचा DPR बाबतची देयके अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती इ. मध्ये तांत्रिक मान्यता प्रदान होऊनही सदर देयके शासनाने अदा केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वेळोवेळी पाठपुरावा करुनही सदरहू प्रलंबित देयकांबाबत शासनाकडून कार्यवाही न होण्याबाबतची कारणे काय असून उपरोक्त अनियमिततेबाबत जबाबदार संबंधितांवर योग्य ती कारवाई करुन प्रलंबित देयके तात्काळ मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) मे.जगप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी अमरावती जिल्ह्यातील नगरपरिषदा, हिंगोली, लातूर, कर्जत, तुळजापूर, औरंगाबाद, अहमदनगर, गेवराई, वसई-विरार, डहाणू व उदगीर या स्थानिक स्वराज्य संस्थांची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे बाबतची देयके प्रलंबित असल्याबाबत शासनास निवेदन दिले होते.

सदर विषयाच्या अनुषंगाने दिनांक १६ ऑक्टोबर, २०२०, दिनांक १५ डिसेंबर, २०२०, दिनांक १८ जून, २०२१ आणि दिनांक २२ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये संबंधिताना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

## राज्य महिला आयोगामार्फत राबविण्यात आलेल्या “प्रज्वला” योजनेमध्ये शासनाच्या निधीचा गैरवापर होत असल्याबाबत

**(१६) ६४८८ (१५-०३-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ५०३२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महिला आयोगामार्फत राबविण्यात आलेल्या प्रज्वला योजनेमध्ये शासनाच्या निधीचा गैरवापर होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून या योजनेंतर्गत राज्य महिला आयोगाने राज्यातील महिला बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्याकरीता निधीचा वापर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रज्वला योजनेतील कामाकरीता शासनाचा निधी वापरण्याबाबत कोणताही शासन निर्णय किंवा सदर योजनेचा महिला आयोगाच्या कार्यकक्षेत समावेश नसतानाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांनी महिला बचत गटांना प्रशिक्षण दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील महिला बचत गटांना महिला आर्थिक विकास महामंडळ निधी/आर्थिक मदत करत असतानाही निधी खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निधी खर्च करण्याबाबत शासनाने शासन निर्णय व प्रज्वला योजनेंतर्गत करण्यात आलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखा शाखेकडून पारित केले आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने प्रज्वला योजनेची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)(१५-०४-२०२१) :** (१) व (२) शासन स्तरावरुन नवीन प्रज्वला योजना राबविण्यास अथवा निधी उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आलेली नाही. तथापि, महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(३) महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या नियमित कार्यक्रम निधीतून राज्यातील महिला बचत गटांच्या प्रशिक्षणासाठी खर्च करण्यात आला आहे.

(४) महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत झालेल्या निधीचा खर्च आयोगाच्या बोर्डाने निर्देशित केल्यानुसार तसेच मान्यतेने करण्यात आलेला आहे. याबाबत लेखाविषयक बाबींचे/ वित्तीय नियमावलींचे अनुपालन करण्यात करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर खर्चाची प्रमाणके, उपयोगिता प्रमाणपत्र इ. महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयात उपलब्ध आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) येथील भात खरेदी केंद्रावर सोयी सुविधा व कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) ६९३२ (१५-०३-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथे सुरु करण्यात आलेल्या भात खरेदी केंद्रावर सोयी सुविधा व कर्मचारी उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर येथे भात खरेदी केंद्रावर अनधिकृत दलालांच्या संख्येत वाढ होत असून शासनाने संबंधित दोषींवर कारवाई करून भात खरेदी केंद्रावर सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०७-०९-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे अंतर्गत उप प्रादेशिक कार्यालय, शहापूर अंतर्गत आकृतीबंधानुसार ४३ पदे मंजूर असून, सद्य:स्थितीत १३ पदे कार्यरत आहेत. तथापि, एका खरेदी केंद्र प्रमुखास एकापेक्षा जास्त खरेदी केंद्रांचा पदभार दिलेला असून शेतकऱ्यांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत यांची दक्षता घेण्यात येत आहे. प्रादेशिक कार्यालय, जव्हार यांचे प्रस्तावाप्रमाणे शहापूर तालुक्यात ६ व मुरबाड येथे २ अशी एकूण ८ धान खरेदी केंद्र मंजूर असून, सदर खरेदी केंद्रांवर खरेदी करण्यात आलेली आहे.

(२) उप प्रादेशिक कार्यालय, शहापूर अधिनस्त खरेदी केंद्रांवर शासन निर्णयानुसार online पध्दतीने खरेदी करण्यात आली असून, कोणत्याही प्रकारचे अनधिकृत दलालामार्फत खरेदी होत नाही. याबाबत प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांच्या कार्यक्षेत्रात शेतकऱ्यांकडून कोणतीही तक्रार जिल्हा पुरवठा अधिकारी,ठाणे यांना प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये पदे रिक्त असल्याबाबत

**(१८) ७४३१ (१७-०३-२०२१) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये २५ ते ४० टक्के पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासकीय कार्यालयात कमी कर्मचारी असल्यामुळे शासकीय कामे विलंबाने होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०१-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे. माहे डिसेंबर, २०१९ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासकीय आणि जिल्हा परिषद कार्यालयांमधील गट अ, ब, क व ड या संवर्गातील एकूण ७,८०,५२३ पदांपैकी अंदाजे २,००,१९३ इतकी पदे रिक्त आहेत.

(२) नाही. उपलब्ध कर्मचारी, संगणक आणि ऑनलाईन कामकाज/ बैठका इत्यादींच्या आधारे प्रशासकीय कामकाज करण्यात येत आहे

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात होणाऱ्या वृक्षतोडीबाबत

**(१९) ७८१५ (१५-०३-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात मोह, आंबा, जांभूळ, खैर, ऐन, साग,धावडा इत्यादी वृक्षांची मोठ्या प्रमाणात विनापरवाना कंत्राटदाराकडून वृक्षतोड होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनापरवाना वृक्षतोड होत असल्याबाबतची तक्रार उपसरपंच भास्कर पतंगराव यांनी मा.मुख्यमंत्री व वनमंत्र्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१३-०९-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील मौजे सायले येथील मालकी क्षेत्रात संबंधित खातेदारांकडून विनापरवाना तोड झाल्याचे वनक्षेत्रपाल मुरबाड पूर्व यांचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) मुरबाड तालुक्यातील मौजे सायले येथील मालकी सर्वे क्रमांक ८९/६ मधील विविध प्रजातींच्या ६४ वृक्षांची तसेच मौजे सायले येथील मालकी सर्वे क्रमांक १४१/१, १४१/१०, १४१/११, १४१/१३, १४१/९, १४२/१, १४२/२, १४२/३, १४२/३/२, १४२/४, १४२/५, १४३/२ मधील विविध प्रजातींच्या ४२ वृक्षांची विनापरवाना तोड झाल्याचे वनक्षेत्रपाल मूरबाड पूर्व यांचे निदर्शनास आल्याने त्यांनी महाराष्ट्र खाजगी वृक्षतोड अधिनियम, १९६४ अन्वये कारवाई केली आहे. सदर कारवाईअंती संबंधित खातेदार यांना प्रत्येकी रुपये २०००/- चा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ११.३८७ घ.मी. माल जप्त करुन सरकार जमा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यात धान्य पुरवठा करणाऱ्या वाहनांना जीपीएस प्रणाली बसविण्याबाबत

**(२०) ८००० (१५-०३-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात धान्य पुरवठा करणाऱ्या वाहनांना जीपीएस प्रणाली बंधनकारक असूनही वाहनांना जीपीएस प्रणाली बसविण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीपीएस प्रणालीची ऑनलाईन प्रिंट निघत नाही तसेच, वाहतुकीची देयके कोणत्या अनुषंगिक बाबी पाहून अदा करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२०-०४-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही, वाहतुकीची देयके वाहतूक पास, त्यावर वाहतूक प्रतिनिधी, गोदाम रक्षक, स्वस्त धान्य दुकानदार यांची स्वाक्षरी असल्याचे तपासून, नियमाप्रमाणे कार्यवाहीचे अनुपालन करून अदा केली जात आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई अग्निशमन दलातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२१) ८४१४ (१५-०७-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अग्निशमन दलातील सुमारे ८०० हून अधिक पदे रिक्त असल्याची बाब दिनांक १३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे अग्निशमन दलातील एएलपी, हॅजमेट, टीटीएल इत्यादी वाहने बंदावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुंबई अग्निशमन दलातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबई अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

- मागील वर्षी एकूण ३४ यंत्रचालक व ४७ प्रमुख अग्निशामक यांना पदोन्नती देण्यात आल्या आहेत.
- ९० यंत्रचालक, १५० प्रमुख अग्निशामक व ६१ दुय्यम अधिकारी यांची पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
- अग्निशामक पदासाठी सरळसेवेने भरती करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील तिन्ही आरटीओ कार्यालयाचे काम बंद असल्याबाबत

**(२२) ८४६३ (१५-०६-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात नागपूर जिल्ह्यातील तिन्ही आरटीओ कार्यालयाचे काम बंद असून कोरोनाच्या वाढत्या संक्रमणामुळे रूग्णांची वाढती संख्या पाहता रुग्णांना रूग्णालयात पोहचविण्याकरीता शहरात नविन ॲम्बुलन्सची खरेदी केली असताना देखील आरटीओ कार्यालय बंद असल्याकारणाने पासिंग व रजिस्ट्रेशन अभावी ॲम्बुलन्स मिळण्यास विलंब होत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती व यवतमाळ येथे कोरोनाचा प्रादुर्भाव असतानादेखील येथील आरटीओ कार्यालय सुरळीतरित्या सुरु असून नागपूर येथील आरटीओ कार्यालय बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर जिल्ह्यातील तिन्ही आरटीओ कार्यालयाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२१-०९-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यामध्ये कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी अत्यावश्यक सेवेशी संबंधित कार्यालये वगळता सर्व शासकीय कार्यालये त्यांच्या एकूण क्षमतेच्या ५० टक्के कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सुरु होती. त्यानुषंगाने नागपूर जिल्ह्यामध्ये माहे एप्रिल व मे २०२१ मध्ये प्राप्त झालेल्या अर्जानुसार अनुक्रमे २ व १९ रुग्णवाहिका वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यात कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचा वेग कमी होत असल्याबाबत

**(२३) ८४९१ (१०-०६-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या दुसऱ्या लाटे पाठोपाठ माहे जुलै-ऑगस्टमध्ये तिसरी लाट येण्याची भीती व्यक्त होत असून संसर्गापासून बचावासाठी लसीकरण हे महत्त्वपूर्ण सुरक्षाकवच असल्याचे वैद्यकीय तज्ञ सांगत असतानाही गेल्या काही दिवसात मुंबईसह राज्यात कोरोना प्रतिबंध लसीकरणाचा वेग कमी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी पहिला डोस पूर्ण झालेल्या जेष्ठ नागरिक व ४५ वर्षावरील नागरिकांना दुसरा डोस मिळत नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लस उपलब्ध होत नसल्याने शहरी व ग्रामीण भागातील खाजगी, शासकीय व महापालिकेच्या सर्वच केंद्रावरील लसीकरणाची संख्या मर्यादित राहिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईसह राज्यात सर्व नागरिकांना पहिला व दुसरा डोस लवकरात लवकर मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०८-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून राज्य शासनाला कोविड लसींचा पुरवठा वेळोवेळी करण्यात येतो. त्यामुळे ज्या प्रमाणात केंद्र शासनामार्फत राज्याला लशी उपलब्ध होतात त्यानुसार लाभार्थ्यांचे लसीकरण करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत कोविशिल्ड व कोव्हॅक्सिन लस प्राधान्याने दुसऱ्या डोस करीता व तदनंतर प्रथम डोससाठी वापरण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र राज्याकरीता लस उपलब्ध होण्यासाठी केंद्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या समतोल विकासासंदर्भात डॉ.विजय केळकर समितीने अहवालात सादर केलेल्या शिफारशीबाबत

**(२४) ८५०६ (१०-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ६६४४ ला दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय असमतोलाचा अभ्यास करुन राज्याचा समतोल विकासाबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य शासनाने सन २०११ मध्ये जेष्ठ अर्थतज्ञ डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौदा सदस्यांच्या समितीने दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ मध्ये शासनास अहवाल सादर केला असून त्यात प्रदेश आणि क्षेत्रांमध्ये असंतुलन शोधणे आणि राज्यामध्ये समतोल विकास साधण्यासाठी शिफारस केलेली असून सदर अहवाल माहे मार्च, २०१५ मध्ये महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सभागृहास सादर केला असतानाही गेल्या सात वर्षापासून त्यावर निर्णय घेण्यात आला नसून अहवालातील शिफारशी संदर्भात विचार करण्यासाठी माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समतोल प्रादेशिक विकासाकरीता उच्चस्तरीय समितीच्या अहवालामध्ये प्रादेशिक नियतव्यय वाटप, आदिवासी क्षेत्राचा विकास, नवीन शेती पध्दतीची आव्हाने, औद्योगिकीरणाचा प्रसार, जलसंपत्तीचे निर्माण, आरोग्य व शिक्षण, व्यवस्था विस्तृत करणे अशा महत्वाच्या विषयाबाबत विविध शिफारशींचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वार्षिक कार्यक्रम सन २०२०-२०२१ करीता दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी मा.राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशांमध्ये प्रदेश आणि क्षेत्रांमध्ये असंतुलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सूचविणे यासाठी समिती स्थापन करावी याचा समावेश केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने आपला अहवाल सादर केला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२४-०९-२०२१)** : (१) डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित उच्चस्तरीय समितीच्या अहवालामध्ये प्रदेश आणि क्षेत्रांमध्ये असुंतलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल विकास साधण्यासाठी

शिफारस केलेली आहे. यासंदर्भात, मंत्रिमंडळ उप समिती २०१५ मध्ये गठीत करण्यात आलेली आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) वार्षिक कार्यक्रम सन २०२०-२१ करीता दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी मा.राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशांमध्ये प्रदेश आणि क्षेत्रांमध्ये असुंतलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सूचविणे, यासाठी समिती स्थापन करावी याचाही समावेश केला आहे.

(४) व (५) डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समतोल प्रादेशिक विकासाकरीता उच्चस्तरीय समितीच्या अहवालामधील शिफारशीसंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन, अहवालातील शिफारशी स्विकारण्यासंदर्भात मंत्रिमंडळ उप समिती २०१५ मध्ये गठित करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

---

## राज्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांचे लसीकरण जलदगतीने करण्याबाबत

**(२५) ८५३७ (१७-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना काळात जीव धोक्यात घालून सेवा देणाऱ्या डॉक्टर, परिचारीका,अधिपरिचारीका (आरोग्य कर्मचारी आणि अत्यावश्यक सेवांमधील कर्मचारी) यांना कोरोना संसर्गाचा सर्वाधिक धोका असताना देखील माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ४०% आरोग्य कर्मचाऱ्यांचे आणि अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे लसीकरण झाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आरोग्य कर्मचारी व अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाला होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांचे लसीकरण जलदगतीने करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०८-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्यात कोविड लसीकरण मोहिम दिनांक १६ जानेवारी, २०२१ पासून सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कोविड लसीकरण मोहिमेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मोहिमेची सुरुवात हेल्थ केअर वर्कर व फ्रंट लाईन वर्करच्या लसीकरणाने झाली. माहे मे, २०२१ अखेर ७७ टक्के आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे लसीकरण करण्यात आले आहे.

(२) व (३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सर्व हेल्थ केअर वर्कर्स व फ्रंट लाईन वर्कर्स यांचे लसीकरण करण्यात येत आहे. दिनांक १ जुलै, २०२१ पर्यंत ८२ टक्के हेल्थ केअर वर्कर आणि ९६ टक्के फ्रंट लाईन वर्कर यांना पहिला डोस देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अवकाळी पावसामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या फळबागांच्या व पिकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(२६) ८६०७ (१६-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील ३८० शेतकऱ्यांचे २३०० हेक्टरवरील फळबागांचे माहे एप्रिल, २०१९ च्या दुसऱ्या सप्ताहात झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या द्राक्षबागा, डाळिंब, केळी, आंबा, लिंबू, पपई,ज्वारी तसेच बेदाणे इत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश शासनाकडून देण्यात आलेले आहेत काय, त्यानुसार शासनाकडून पंचनामे पूर्ण करुन, नुकसानीची आकडेवारी, नुकसानग्रस्त क्षेत्र, बाधित शेतकऱ्यांची संख्या तपासून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (३०-०९-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) शासनाने दिनांक १९/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये पंचनामे करण्याचे आदेश विभागीय आयुक्त, पुणे यांना देण्यात आले होते. त्यानुसार नुकसान भरपाईबाबत आर्थिक मदतीसाठीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य वीज नियामक आयोगाने उच्च दाब पारेषण वाहिनी बसविण्याचे काम विनानिविदा अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई इन्फ्रा लिमिटेडला दिल्याबाबत

**(२७) ८६२३ (०९-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला वीज पुरवठा करता यावा यासाठी कूडूस ते पश्चिम उपनगरातील आरे उपकेंद्रादरम्यान उच्च दाब पारेषण वाहिनी बसविण्याचे रुपये सात हजार कोटीचे काम विनानिविदा अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई इन्फ्रा लिमिटेडला देण्याचा आदेश राज्य वीज नियामक आयोगाने माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाच्या खर्चापोटी मुंबईसह राज्यातील वीज ग्राहकांवर प्रति युनिट काही रकमेचा बोजा पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य वीज नियामक आयोगाने उच्च दाब पारेषण वाहिनी बसविण्याचे काम विनानिविदा अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई इन्फ्रा लिमिटेडला दिल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशाबाबत व राज्यातील वीज ग्राहकांवर आर्थिक बोजा पडू नये याबाबत आढावा घेऊन कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२७-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ही एक अर्ध-न्यायिक संस्था असून सदर आयोगाचे कामकाज विद्युत अधिनियम, २००३ व प्रचलित विनियमांनुसार करण्यात येते.

सध्याच्या परिस्थितीत मुंबई पारेषण वाहिन्यांच्या अपुऱ्या क्षमतेमुळे बाहेरील स्वस्त वीज मुंबईतील ग्राहकांसाठी पारेषित करणे शक्य होत नाही. सदर पारेषण वाहिन्यांच्या अपुऱ्या क्षमतेमुळे मुंबईत उपलब्ध असलेल्या वीजनिर्मात्यांकडून महाग वीज विकत घ्यावी लागते. पारेषण वाहिन्यांची अपुरी क्षमता लक्षात घेऊन विविध समित्यांनी (खापर्डे समिती, झाल्टे समिती, उच्च-स्तरीय समिती इ.) कुडुस उपकेंद्र ते आरे उपकेंद्रा दरम्यान एचव्हीडीसी वाहिनी उभारण्याची शिफारस केली आहे.

मे. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एइएमआयएल) या कंपनीला आयोगाने दिनांक २१/०३/२०२१ रोजीच्या आदेशान्वये पारेषण परवाना प्रदान केलेला आहे.

तसेच एइएमआयएल या कंपनीने एचव्हीडीसी प्रकल्पाचे काम आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदा मागवून करावे, असे आयोगाने आदेश दिलेले आहेत.

आयोगाच्या दिनांक २१/०३/२०२१ रोजीच्या आदेशाला टाटा पॉवर कंपनीने विद्युत अपिल न्यायाधिकरणामध्ये आव्हान दिले असून सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने एचव्हीडीसी प्रकल्पाच्या खर्चाचे मूल्यांकन करण्यासाठी आयआयटी, मुंबई या संस्थेची नियुक्ती केली आहे. तसेच आयोगाच्या आदेशानुसार प्रकल्पाची उभारणी आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदा मागवून केली जाईल.

या प्रकल्पाच्या खर्चापोटी महाराष्ट्रातील सर्व वीज ग्राहकांवर येणारा अधिभार हा पारेषण दराच्या चौकटीनुसार प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाल्यानंतर पारदर्शकपणे जाहीर सुनावणी घेऊन प्रचलित विनियमांनुसार आकारण्यात येईल.

---

## अमरावती, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, अकोला या जिल्ह्यांमधील अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळणेबाबत

**(२८) ८६९५ (१५-०६-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे १९ लाख १६ हजार ३६७.०८ हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली असून यात १७ लाख ३६ हजार २५५ शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळाली नसल्याची बाब माहे मे, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनाकडून ९६ कोटी ८४ लाख ६१ हजारांचा मदतनिधी जिल्हानिहाय व तालुकानिहाय वितरित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने माहे जून ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत अमरावती, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, अकोला या जिल्ह्यांमधील अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या ज्या शेतकऱ्यांचे रब्बीतील फळपिकांचे १५,८९८ हेक्टरमध्ये ३३ टक्के नुकसान झाले आहे अशाच शेतकऱ्यांनाच मदत निधी वितरित करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अमरावती, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, अकोला या जिल्ह्यांमधील अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान झालेल्या अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत न मिळालेल्या शेतकऱ्यांना मदत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (३०-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) माहे जून ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीमध्ये अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे शेती / फळपिकांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आहे होते. त्यानुसार बाधित क्षेत्राचे संयुक्त पंचनामे करण्यात आले असून नुकसानीबाबत दिनांक ०९/११/२०२० अन्वये रुपये २६२१९.७२ लक्ष व दिनांक ०८/०१/२०२१ अन्वये रुपये २६२१९.६६ लक्ष असा एकूण रुपये ५२४३९.३८ लक्ष इतका निधी विभागीय आयुक्त, अमरावती यांना वितरीत करण्यात आला होता. त्यापैकी रुपये ४७७२६.२७ लक्ष इतके अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोविशिल्ड या कोरोना प्रतिबंधक लसीच्या खरेदीबाबत

**(२९) ८७५५ (१०-०६-२०२१) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविशिल्ड या कोरोना प्रतिबंधक लसीच्या खरेदीबाबत राज्य शासनाने वेळीच निर्णय न घेतल्यामुळे लसीकरणाला विलंब झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिरम इन्स्टिट्यूटने माहे एप्रिल व मे, २०२० दरम्यान महाराष्ट्र शासनाला लसीकरणाबाबत प्रस्ताव दिला असून शासनाच्या शासकीय सल्लागाराने निर्णय न घेतल्यामुळे त्यावर निर्णय होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने केंद्र शासनाचे कोणतेही निर्बंध नसताना लस खरेदीबाबत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०८-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यात जलसंधारणाच्या कामात आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३०) ८७५७ (२२-०६-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाभुळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात सन २०१५ ते २०१९ दरम्यान नाला खोलीकरण, बंधारे दुरुस्ती कामामध्ये पुणे व यवतमाळ येथील कंत्राटदारांनी आर्थिक व तांत्रिक मापदंडानुसार कामे न करता कामात अनियमितता केली असून जलयुक्त शिवार योजनेत कोटयवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत १३३७ गावांमध्ये मृद व जलसंधारणाची ५० हजार ३५७ उपचार कामे झाली त्यावर रुपये ३०४ कोटी ८ लक्ष खर्च करण्यात आला असून येथील अनेक गावांमध्ये कुठल्याही प्रकारची जलसंधारणाची कामे न करता आर्थिक गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यवतमाळ जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित शासकीय अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (२२-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

बाभुळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात सन २०१५ ते २०१९ दरम्यान नाला खोलीकरण, बंधारे दुरूस्ती कामे घेण्यात आली. परंतु सदर कामे ही यवतमाळ जिल्ह्यातील कंत्राटदारांनी केलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

सन २०१५-१६ ते २०१८-१९ या वर्षांमध्ये यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत १३३७ गावांमध्ये मृद व जलसंधारणाची ४९ हजार ३४२ कामे पूर्ण करण्यात आली असून त्यावर रुपये ३६४.४७ लक्ष खर्च करण्यात आला आहे. सदर काम करताना ग्रामस्तरीय अधिकारी यांनी शिवार फेरी करून कामाची स्थळ निश्चिती केली. तालुकास्तरीय समितीने कामाचे अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता देऊन जिल्हास्तरीय समितीकडून प्रशासकीय मंजूरी प्राप्त करून ई-निविदा पूर्ण करून न्यूनतम दराच्या कंत्राटदारांना बांधकामाचे कार्यारंभ आदेश देवून कामे पूर्ण करून घेतली आहेत. सदर कामांची नोंद एमआरसॅक

या संकेतस्थळावर नोंदवून खर्च करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात तौक्ते चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या भागाची पहाणी करुन नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३१) ८७६८ (२२-०६-२०२१) श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.नरेंद्र दराडे, डॉ.रणजित पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई शहर/उपनगर, पश्चिम महाराष्ट्र व कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणेसह अन्य जिल्ह्यात दिनांक १६ मे, २०२१ रोजी तौक्ते चक्रीवादळामुळे सर्वत्र जोरदार वारे व पाऊस पडल्यामुळे अनेक ठिकाणी झाडे, घरे पडून अनेक घरांचे नुकसान होऊन हजारो व्यक्ती बेघर झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणातील आंबा बागायतदारांचे पहिल्या हंगामात फारसे उत्पादन नसल्यामुळे शेवटच्या हंगामातील फळे व पिकांचे तौक्ते चक्रीवादळात मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन उत्पन्न देणारी झाडेही उन्मळून पडल्यामुळे बागायतदारांचे १०० कोटींचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तौक्ते चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या भागाची पहाणी करुन नुकसानग्रस्त कुटुंबाला १० हजार रुपयांची तातडीची मदत करण्यात यावी याबाबतचे निवेदन पत्राव्दारे कोकण पदवीधर मतदार संघाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्याना दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, तौक्ते चक्रीवादळग्रस्तांना २५० कोटी रुपये इतके पॅकेज देण्याबाबतचा शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येईल असे मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांनी दिनांक २६ मे, २०२१ रोजी जाहीर केले आहे तसेच तोक्ते चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्यांना केंद्र शासनाने राज्य शासनास काही आर्थिक मदत केली आहे काय,

(५) असल्यास, शासनाने जाहीर केलेल्या मदतीसंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करणे, ताक्ते चक्रीवादळामुळे नुकसानग्रस्त झालेल्या भागाची पाहणी करणे, नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (३०-०९-२०२१) :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

(३), (४) व (५) तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीबाबत राज्य आपत्ती प्रतिसाद निधी दरानुसार व वाढीव दराने मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला असून दिनांक २३/०६/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये १७०.७२ कोटी इतका निधी विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती यांना वितरीत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे तौक्ते चक्रीवादळात मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना रुपये ३.७६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे केंद्र शासनास रुपये २०६३३.९७ कोटी इतके आर्थिक मदतीचे सुधारित ज्ञापन दिनांक २६ जुलै, २०२१ रोजी पाठविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होऊन त्यांच्या शेतमालाला योग्य तो भाव मिळण्याबाबत

**(३२) ८७८२ (१७-०६-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात परतीच्या व अवकाळी पावसामुळे ३१,१२७ हेक्टर जमिनीवरील शेतीचे नुकसान झाल्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक विवंचनेत असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरत्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी करुन ३१,१२७ हेक्टर शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच यवतमाळ जिल्ह्यासह विदर्भातील अनेक शेतकऱ्यांचे उत्पन्न घटल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नैराश्याचे प्रमाणदेखील वाढत असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी त्याच्या शेतमालाला योग्य बाजारभाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (३०-०९-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) माहे जून ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी यवतमाळ जिल्ह्यासाठी ३४७७.९० लक्ष निधी जिल्हाधिकारी यांना वितरीत करण्यात आला होता.त्यापैकी रुपये ३०२८.६८ लक्ष निधीचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माध्यमिक शाळेतील वर्ग प्राथमिक शाळांना जोडण्याबाबतचा शासन निर्णय रद्द घोषित करण्याबाबत

**(३३) ८८०२ (१५-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माध्यमिक शाळेतील इयत्ता ५ चा वर्ग प्राथमिक शाळांना जोडणे व इयत्ता ५ वीच्या वर्ग शिक्षकाचे समायोजन करण्यास तत्वत: मंजुरी देण्याबाबतचा बेकायदेशीर शासन निर्णय मा.शालेय शिक्षण मंत्र्यांची परवानगी न घेता दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बेकायदेशीर शासन निर्णय रद्द घोषित करून संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्याची मागणी नागपूर विभागाचे शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक २०/०९/२०२०, ३०/०९/२०२० व दिनांक ३०/०१/२०२१ रोजी निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शासन निर्णय रद्द घोषित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-०९-२०२१) :** (१) नाही.
(२) होय.

(३) या संदर्भातील शासन निर्णय विहित कार्यपध्दतीनूसार व नियमानूसार शासनाच्या मान्यतेने दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावसासह गारपीटीने शेतकऱ्यांच्या पिकांचे व फळबागांचे मोठे नुकसान झाल्याबाबत

**(३४) ८८४६ (०९-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विविध भागात विशेषतः नाशिक जिल्ह्यात माहे मार्च व एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अवकाळी पावसासह गारपीटीने शेतकऱ्यांच्या पिकांचे व फळबागांचे मोठे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील ७ हजार ५२१ शेतकऱ्यांची ५ हजार ७०२ हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतचा प्राथमिक अहवाल कृषी व महसूल विभागाने जाहीर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने नाशिक जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना विनाविलंब नुकसान भरपाई मिळावी त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (३०-०९-२०२१) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे, नाशिक जिल्ह्यामध्ये मार्च व एप्रिल, २०२१ मध्ये १२५५४ शेतकऱ्यांच्या शेतीपिके व फळपिकांचे एकूण ८४६२.७७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) होय.
(४) नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बदलापूर (जि.ठाणे) पश्चिमेकडील बसस्थानकातील स्वच्छतागृहाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३५) ८९६८ (१५-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) पश्चिमेकडील बसस्थानकातील स्वच्छतागृहाची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात रेल्वे सेवा बंद असताना शासकीय व खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना बदलापूर पश्चिमेकडील बसस्थानकातून प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध होती, परंतु, बसस्थानकातील स्वच्छतागृहाची अत्यंत दुरवस्था झाल्याने पुरुषांची गैरसोय होत असून बसस्थानकात महिलांसाठी कोणतेही स्वच्छतागृह उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बदलापूर पश्चिमेकडील बसस्थानकात महिला व पुरुषांसाठी सुस्थितीत स्वच्छतागृह बांधण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२१-०९-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) बदलापूर बसस्थानकात महिला व पुरषांकरीता स्वच्छतागृह उपलब्ध असून, ते सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांकडील वीज देयकाची थकबाकी महावितरणकडे वळती करण्याबाबत

**(३६) ९०४७ (१०-०६-२०२१) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज संस्थाकडील वीज देयकाच्या थकबाकीमध्ये ग्रामपंचायतीच्या दिवाबत्ती योजनेचे प्रमाण मोठे असून या योजनेसाठी तरतूद करताना शासनाकडून अद्यापि १० ते १५ वर्षापूर्वीचा वीज वापर आणि दर गृहीत धरला जात असल्याने प्रत्यक्षात वार्षिक देयक ९५० कोटी असताना तरतूद २२८ कोटी रूपयांची केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थांना वीज देयकाचा भरणा करण्यासाठी शासनाकडून दिले जाणारे अनुदान पुरेशा प्रमाणात महिन्याला अग्रिम स्वरूपात अदा करण्याची विनंती महावितरणकडून शासनाला करण्यात आली आहे, तसेच, प्रत्यक्षात येणाऱ्या खर्चासाठी शासन अर्थसंकल्पात तरतूद करणार काय,

(३) असल्यास, शाळेतील मुख्याध्यापकांना वीज बिलापोटी वेतनातून पैसे भरावे लागत असून शाळा अंधारात असल्याने विद्यार्थ्यांना संगणकाच्या व इतर शिकवण्या विजे अभावी देता येत नसल्याने प्राथमिक शाळा, अंगणवाड्या, माध्यमिक शाळा, इतर शैक्षणिक संस्था व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना घरगुती दराप्रमाणे वीज बिल देण्यासाठी महावितरण कंपनीस विनंती करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकीही वाढत असून पथदिवे, दिवाबत्ती आणि पाणीपुरवठा योजनेचे देयक अनेक वर्षे प्रलंबित असल्याने सात हजार कोटीहून अधिक रक्कम प्रलंबित असल्याचे महावितरण कंपनीने शासनाचे निदर्शनास आणून दिले असून १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून स्थानिक स्वराज्य संस्थांकडील १०० टक्के थकबाकी वजा करुन घेऊन ती महावितरणकडे थेट वळती करण्याची विनंती महावितरणने शासनाकडे यापूर्वीच केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महावितरणच्या सदरहू मागणीबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२१-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) सदर बाब शालेय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य या विभागाशी संबंधित असून त्या विभागास महावितरणशी पत्रव्यवहार करण्याचे कळविण्यात येत आहे.
(४) हे खरे आहे.
(५) कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये निकृष्ट दर्जाचे खाद्य पुरवठा केल्याबाबत

**(३७) ९११६ (२०-०७-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील हडपसर येथील शाळा क्रमांक ५८ या मुलींच्या शाळेला दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेडमार्फत शालेय पोषण आहार योजनेंतर्गत महापालिकेच्या आदेशानुसार धान्य पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळेत पुरवठा करण्यात आलेल्या हरभराच्या ३० तर तुरडाळीच्या २९ गोण्यांमध्ये जनावरांना देण्यात आलेला हरभरा व तुरडाळ आढळून आली तसेच कडधान्याच्या प्रत्येक गोणीत ५-५ किलो कडधान्य कमी असल्याचे दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या धान्याच्या गोणीवर महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शालेय पोषण आहार धान्याचे वितरण तसेच वाहनांच्या दर्शनी भागावर देखील अशा स्वरुपाचे उल्लेख करणे बंधनकारक असताना तसे कोणताही उल्लेख नसल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थाचा पुरवठा केल्याप्रकरणी संबंधित दोषी कंत्राटदार तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ नुसार कारवाई करण्याची मागणी भंडारा-गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधींनी तसेच, पुणे महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांकडे दिनांक २२ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०९-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

सदरप्रमाणे दिनांक २२ मार्च, २०२१ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(५) सदर प्रकरणी प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन त्रिस्तरीय समिती नेमून चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित पुरवठेदारावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना महामारी व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकांकडून पीक कर्ज वाटप करण्याबाबत

**(३८) ९१४९ (१५-०६-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०२०-२०२१ च्या खरीप हंगामासाठी योजलेले ४५ हजार कोटींचे पीक कर्ज वाटपाचे उद्दीष्ट पूर्ण झालेले नसून काही जिल्ह्यात पीक कर्ज वाटपाची टक्केवारी २० टक्क्यांच्याही पुढे गेलेली नाही, तसेच कोरोना महामारी व नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांना राज्यातील राष्ट्रीयकृत बँकांकडून पीक कर्ज देण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोरोना महामारी व टाळेबंदीच्या काळात रासायनिक खते व बियाण्यांच्या किंमती कमी कराव्यात, पीक कर्जासाठी थकित कर्जाची अट शिथिल करुन तातडीने कर्ज वितरित करावे, अशाप्रकारच्या मागण्या शेतकऱ्यांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्याकरीता मा.पालकमंत्री व जिल्हाधिकारी, भंडारा यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत पीक कर्ज देण्याबाबत सूचना देवूनही बँकाकडून शेतकऱ्यांना पीक कर्ज दिले जात नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्याच्या इष्टांकानुसार १०० टक्के पीक कर्ज वाटप करण्याबाबत तसेच रासायनिक खते व बियाणांच्या किंमती कमी

करण्याबाबत तसेच जिल्हा प्रशासनाने बँकेशी समन्वय साधून शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, (५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२०-०९-२०२१) :** (१) नाही.

(२) अंशतः खरे आहे.

रासायनिक खतांच्या किंमती कमी कराव्यात अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

(३) नाही

(४) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये शेतकऱ्यांना बँकामार्फत उपलब्ध करुन द्यावयाच्या अल्पमुदती पीक कर्जासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे -

१. सन २०२१-२२ मध्ये बँकांमार्फत शेतकऱ्यांना द्यावयाच्या विविध प्रकारच्या पिकांच्या उत्पादनासाठी पीकनिहाय कर्जदर दिनांक ०८/०३/२०२१ रोजी निश्चित करण्यात आले.

२. सहकार विभागातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिनांक ०७/०४/२०२१ रोजी खरीप हंगामातील पीक कर्जवाटपाच्या अनुषंगाने पुर्वतयारीच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

३. दिनांक २२, २३ व २९ एप्रिल, २०२१ रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नाबार्डचे अधिकारी व विभागाचे क्षेत्रिय अधिकारी यांची सभा घेऊन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील निधी उपलब्धतेबाबत आढावा घेऊन सुचना देण्यात आल्या आहेत.

४. दिनांक ०५/०५/२०२१ रोजी राज्यस्तरीय बँकर्स समिती सोबत सभा घेऊन पीक कर्ज वाटपाच्या अनुषंगाने कार्यवाहीच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

५. दिनांक १९/०५/२०२१ रोजी राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या उपसमितीच्या बैठकीमध्ये प्रमुख बँकांसोबत पीक कर्ज वाटपाच्या नियोजनाबाबत चर्चा केली आहे.

६. दिनांक ०३/०६/२०२१ रोजीच्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या सभेमध्ये मा.मुख्यमंत्री महोदय यांनी बँकांमार्फत करावयाच्या पीक कर्जवाटपाच्या अनुषंगाने बँकांना सुचना दिल्या आहेत.

रासायनिक खतांवरील अनुदान केंद्रीय खत विभागामार्फत देण्यात येते. केंद्रीय खत विभागाने दिनांक २०/०५/२०२१ रोजी सन २०२१-२२ करीता अनुदानाचे दर घोषीत केलेले आहेत. स्फुरद या मुलद्रव्याचे अनुदानात वाढ केल्याने खतांच्या विक्री किंमतीत घट झालेली आहे.

तसेच खरीप हंगामातील बियाणे विक्रीमध्ये सोयाबीनचा वाटा ७० ते ८० टक्के असतो. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करुन, महाबीजने सोयाबीनच्या प्रचलित वाणांचे दर खरीप २०२० एवढेच ठेवले आहे. मुग, तूर व उडीद या पिकांच्या बाबतीत मागील वर्षी पेक्षा अल्पश्या प्रमाणात वाढ केलेली आहे. राज्यात बियाण्यांच्या किंमती वाढल्याबाबत शेतकऱ्यांकडून कोणतीही तक्रार महाबीज महामंडळास प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरी शिकारी (ता.जि.हिंगोली) येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत उभारण्यात आलेले आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत

**(३९) ९१५२ (१०-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरी शिकारी (ता.जि.हिंगोली) येथे अंदाजे ४८ लक्ष रूपये निधी खर्चून सन २०१५ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत भव्य आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीमध्ये आरोग्य उपकेंद्र सुरू करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बोरी शिकारी गावातील नागरिकांच्या आरोग्याची होत असलेली गैरसोय टाळण्याबाबत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत उभारण्यात आलेले आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१३-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
बोरी शिकारी (ता.जि.हिंगोली) उपकेंद्राच्या नवीन इमारतीचे बांधकाम दिनांक २४/१२/२०१७ रोजी पूर्ण झाले आहे. सदरील इमारतीचा ताबा दिनांक २८/०८/२०१८ रोजी घेण्यात आला असून उपकेंद्रामध्ये आरोग्य सेवा देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील चाकण शहरा लगतच्या भीमा नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत

**(४०) ९१६१ (२०-०७-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील चाकण शहरासह लगतच्या औद्योगिक क्षेत्रामधील कंपन्यांचे केमिकलयुक्त प्रदूषित पाणी भिमा नदीत सोडले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भीमा नदीत सोडलेल्या दूषित पाण्याचा वापर नदीलगतच्या शेतकऱ्यांनी केल्याने त्यांना त्वचा रोगाच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केमिकलयुक्त दूषित सांडपाण्यावर प्रक्रिया करून पुन्हा वापरात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२४-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही. तथापि, चाकण नगरपरिषद हद्दीमधून निर्माण होणरे घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नाल्यांद्वारे भीमा नदीमध्ये मिसळले जाते.
(२) हे खरे नाही.

(३) चाकण शहरालगत असणाऱ्या औद्योगिक वसाहतीमधील सर्व उद्योगांनी औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता स्वत:ची प्राथमिक, व्दितीय व तृतीय स्वरुपाची सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारलेली असून ती कार्यान्वित आहे.

प्रक्रियाकृत सांडपाण्याचे उत्पादन प्रक्रियेमध्ये पुन:चक्रिकरण करुन उरलेले प्रक्रियाकृत सांडपाणी बाग-बगीच्यासाठी वापरण्यात येते.

उद्योगांना शुन्य पाणी विसर्जन (ZLD) निकषावर संमतीपत्र देण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कडोळी ते गोरेगांव (ता.सेनगांव, जि.परभणी) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(४१) ९२१० (१५-०७-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडोळी ते गोरेगांव (ता.सेनगांव, जि.परभणी) या रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसार होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असून बांधकामामध्ये मातीचा भरणा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व शासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१७-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन काम प्रगतीपथावर असून विहित निकषांनुसार करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्याच्या दुतर्फा साईड पट्ट्यांमध्ये भरावासाठी मुरूमाचा वापर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राच्या मागास भागातील अनुशेष दूर करण्याबाबत

**(४२) ९४४५ (१०-०६-२०२१) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेश कराड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राच्या मागास भागातील अनुशेष दूर करण्यासाठी दिनांक १ मे, १९९४ पासून संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) नुसार स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळांची मुदत माहे एप्रिल, २०२० मध्ये संपुष्टात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भासह राज्यातील तीनही प्रादेशिक विभागांना विकास मंडळाची प्रतिक्षा करावी लागत असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून वर्ष निघून गेल्यानंतरही कार्यकाळाचा विस्तार करण्याची राज्य शासनाकडून शिफारस करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकास मंडळांतर्गत राज्याचा अनुशेषाचा प्रश्न गंभीर असून सर्व विभागांना समतोल न्याय देण्यासाठी शासन तालुकास्तरावर शिक्षण, अन्न व नागरी पुरवठा, मदत व पुनर्वसन, सिंचन, सामाजिक न्याय व इतर सर्व विभागाचा अनुशेष दूर करण्यासाठी कृती आराखडा तयार करणार काय,

(४) असल्यास, मराठवाडा विभागही अद्याप शैक्षणिक, आर्थिक व समाजिकदृष्टया मागास असून मराठवाडा विभागाचा अनुशेष पूर्ण झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ या तीनही विकास मंडळांचे पुनर्गठण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्याची सद्य:स्थिती काय आहे व याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२४-०९-२०२१) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांचा कालावधी दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी संपुष्टात आला असल्याने या तीनही विकास मंडळांचे पुनर्गठण करण्याबाबतचा प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) व (४) “निर्देशांक व अनुशेष समिती” ने ३१ मार्च, १९९४ अखेरचा विकास मंडळ निहाय व विकास क्षेत्रनिहाय दर्शविलेला एकूण रुपये १४००६.७७ कोटी अनुशेष निश्चित केला होता.त्यापैकी, मराठवाडा विकास मंडळाकरीता दर्शविलेल्या रुपये ४००४.५५ कोटीच्या अनुशेषाचे निर्मुलन करण्यात आले आहे.
(५) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास या तीनही विकास मंडळांचे पुनर्गठण करण्याबाबतचा प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच, विदर्भ विकास मंडळाचे पुनर्गठण करण्यासंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ कडे जनहित याचिका क्रमांक ७/२०२१ दाखल करण्यात आलेली असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी आश्रमशाळांना मिळणाऱ्या विद्यार्थी परिपोषण खर्चाबाबत

**(४३) ९४४८ (१३-०७-२०२१) श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ५७२५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संस्थांतर्गत चालणाऱ्या आदिवासी आश्रमशाळांना विद्यार्थी खर्च अतिशय कमी म्हणजे पाचव्या वेतन आयोगानुसार १२% दिला जातो व त्यामध्ये विद्यार्थी खर्च भागविणे शाळा व्यवस्थापनास शक्य होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळांना विद्यार्थी खर्च हा प्रति विद्यार्थी दरवर्षी रुपये ५०००/- मिळावा अशी मागणी वारंवार आश्रमशाळा संघटनांमार्फत करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थी खर्च हा प्रति विद्यार्थी प्रति वर्षी रुपये ५०००/- देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अनुदानित आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांकरीता प्रती विद्यार्थी प्रती वर्ष रुपये ५०००/- व अनिवासी विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी प्रती वर्ष रुपये ३०००/- प्रमाणे आकस्मिक अनुदान देण्याबाबत माहे जुलै, २०१९ मध्ये सादर केलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२७-०९-२०२१) :** (१) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ३१/०५/२०१६ च्या शासन निर्णयान्वये विभागातर्गत राज्यातील प्राथमिक व माध्यमिक अनुदानित आश्रमशाळांच्या शाळा व वसतिगृह विभागांना आकस्मिक वेतनेत्तर अनुदान (८ टक्के व १२ टक्के) कर्मचाऱ्यांच्या पाचव्या वेतन आयोगानुसार परिगणना करुन सन २०१६-१७ या वर्षापासून देण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) अनुदानित आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांकरीता प्रती विद्यार्थी प्रती वर्ष् रुपये ५०००/- व अनिवासी विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी प्रती वर्ष रुपये ३०००/- प्रमाणे आकस्मिक अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव जुलै, २०१९ मध्ये सादर केला असता त्यावर वित्त विभागाने राज्यात काही भागात दुष्काळ व काही भागात पुर परिस्थिती याकरीता विविध सवलती व नुकसान भरपाईसाठी येणारे मोठे दायित्व या बाबीचा साकल्याने विचार करता सदर प्रस्ताव तुर्तास पुढे ढकलणे योग्य राहील असे अभिप्राय सप्टेंबर, २०१९ मध्ये दिले होते. सध्या राज्यात कोरोनामुळे निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीमुळे सदर प्रस्तावावर तुर्तास कार्यवाही न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाडयाला हक्काचे पाणी मिळण्याबाबत

**(४४) ९४५७ (२०-०७-२०२१) श्री.राजेश राठोड, श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक ६५८० ला दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यासाठी शासनाने मराठवाडा वॉटर ग्रीड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सन २०१९ मध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केली असून सदर प्रकल्पाचा प्रथम टप्पा सुरू करण्यासाठी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयातील अनेक गावांमध्ये दुष्काळाची स्थिती असूनही मराठवाडयाच्या हक्काचे पाणी इतरत्र विभागांना वळवले जात असल्याने उक्त योजनेमुळे मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरु होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२३-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मराठवाड्याच्या हक्काचे पाणी इतरत्र विभागांना वळवले जाते हे खरे नाही.

पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यात (कोकण) अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे. सदरील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यातील तुटीच्या भागात वळविणेसाठी नदीजोड/वळण योजना प्रस्तावित आहेत.

पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविणेसाठी एकात्मिक राज्य जल आराखड्यात अंतर्भूत असलेल्या योजनांचा प्राथमिक अभ्यास करणेसाठी शासन निर्णय जलसंपदा विभाग दिनांक १७/०९/२०१९ अन्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ३१/१०/२०१९ रोजी शासनास सादर केला आहे.
(३) दिनांक ३१/१०/२०१९ रोजीच्या अहवालानुसार गोदावरी खोऱ्यात कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हास नदी खोऱ्यातून पाणी वळविणेबाबत आखणी करुन त्याबाबत शिफारस केली आहे. उपरोक्त पैकी काही पाणी वळणाच्या पूर्ण/ बांधाकामाधीन योजना आहेत व पाणी वळणाबाबत पार गोदावरी, नदीजोड प्रकल्पाची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी या दोन नदीजोड प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जल विकास अभिकरण, नवी दिल्ली यांचेमार्फत तयार करण्यात येत आहेत. दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उर्ध्व वैतरणा धरणातून गोदावरी खोऱ्यात पाणी सोडणे शक्य आहे. उर्वरित पाणी वळणाबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत जलसंपदा विभाकडून कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या उद्योग विभागाने सादर केलेल्या नवीन औद्योगिक धोरणाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(४५) ९४८६ (१६-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ४३६७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या उद्योग विभागाने दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी पुढील पाच वर्षासाठीचे नवीन औद्योगिक धोरण २०१९ हे जाहीर करण्यात आले असून सदर धोरणातील योजनांची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाने विविध शासन निर्णय निर्गमित केले असून उक्त निर्णयाची पूर्तता करण्यासाठी आखलेल्या निकषांचे स्वरुप काय आहे,

(२) असल्यास, औद्योगिक धोरण जाहीर होवून त्यामधील नवीन योजनाची अंमलबजावणी करण्यासाठी उद्योग विभागाकडून उद्योग धोरणाच्या अंमलबजावणी पध्दती व मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णय निर्गमित झालेला नसून उदयोजकांना त्यांचा फायदा घेता येत नाही व त्यामुळे राज्याच्या औद्योगिक विकासावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने औद्योगिक धोरणामधील काही मुद्ये हे शासनाच्या इतर विभागाशी/क्षेत्रिय कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे सदर मुद्यांच्या अंमलबजावणीसाठी संबंधितांकडून प्रस्ताव प्राप्त होवूनही धोरणाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (३०-०९-२०२१) :** (१) राज्याचे औद्योगिक धोरण-२०१९ हे दिनांक ०७ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले आहे. सदर धोरणातील योजनांची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित केले आहेत:-

अ) शासन निर्णय क्र. एसएमई-२०१९/ प्र.क्र.९३/ उद्योग-७, दिनांक २४/०७/२०१९ अन्वये "महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (एमएसआयसीडीपी)" यामध्ये सुधारणा केली आहे.

ब) शासन निर्णय क्र.योजना-२०१९/प्र.क्र.१२१/ उद्योग-७, दिनांक ०१/०८/२०१९ अन्वये "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम" ही योजना घोषित केली आहे.

क) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१७७/ उद्योग-७, दिनांक ३१/०८/२०१९ अन्वये मुख्यमंत्री रोजगार निर्मीती योजनेच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समितीमध्ये औद्योगिक संघटनांचे नामनिर्देशन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

ड) शासन निर्णय क्र.साप्रोयो-२०१९/प्र.क्र.१४३ /उद्योग-८, दिनांक २३/०८/२०१९ अन्वये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली जागतिक गुंतवणूक प्रोत्साहन परिषदेची स्थापना करण्यात आली.

इ) शासन निर्णय क्र.साप्रोयो-२०१९/प्र.क्र.४६ /उद्योग-८, दिनांक १६/०९/२०१९ अन्वये सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ घोषित करण्यात आली आहे.

फ) शासन निर्णय क्र.निप्रप-२०२०/ प्र.क्र.२८ /उद्योग-७, दिनांक १९/१०/२०२० अन्वये "महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद व जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेची" स्थापना करण्यात आली आहे.

ग) शासन निर्णय क्र.साप्रोयो-२०२०/प्र.क्र.८० /उद्योग-८, दिनांक ३१/०८/२०२० अन्वये कृषीवर आधारीत व अन्न प्रक्रिया उद्योगांना सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत मोठ्या व विशाल प्रकल्पांसाठी विहीत गुंतवणुकीचे / रोजगाराचे निकष व प्रोत्साहने सुधारीत करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण-२०१९ मधील तरतूदींची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने उप प्रश्न-१ च्या उत्तरामध्ये नमूद केल्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयामध्ये त्या-त्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर कार्यपध्दती नमूद करण्यात आली असून सदर योजनांतर्गत तरतूदींचा लाभ राज्यातील उद्योजक घेत आहेत.

(३) उप प्रश्न-१ च्या उत्तरामध्ये नमूद शासन निर्णयाची अंमलबजावणी पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे:-

अ) महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (एमएसआयसीडीपी) अंतर्गत यापूर्वी "ड व ड+" क्षेत्रातील रुपये ५ कोटी पर्यंतच्या खर्चाच्या प्रकल्पांना मंजूरी देण्यात येत होती. महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ मधील तरतुदीनुसार दिनांक २४/०७/२०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये त्यामध्ये सुधारणा करुन "क" क्षेत्राचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. तसेच प्रकल्पाच्या खर्चाची रुपये ५ कोटीची मर्यादा रुपये १० कोटी पर्यंत वाढविण्यात आली आहे.

ब) राज्यातील युवक-युवतींना स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनविण्यासाठी, त्यांचे स्वयंरोजगार प्रकल्प राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्यातून, सुलभतेने उद्योग घटक स्थापित होऊन पुढील पाच वर्षात सुमारे १ लाख सूक्ष्म, लघु उपक्रम स्थापित होणे व त्या माध्यमातून एकूण १० लाख रोजगार संधी राज्यात उपलब्ध होणे इत्यादी करीता "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम" ही योजना दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी राज्यामध्ये सुरु आहे व सदर योजनेचा लाभ युवक-युवती घेत आहेत.

क) राज्यात नवीन उद्योग स्थापन व्हावेत विशेषत: अविकसित भागामध्ये उद्योग स्थापन होवून गुंतवणूक आकर्षित व्हावी, राज्यामध्ये उद्योगधंद्यांचा प्रादेशिकरित्या संतुलित सर्वसमावेशक विकास साध्य करणे यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण-२०१९ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. धोरणात घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १६/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ घोषित करण्यात आली

आहे. सदर योजनेंतर्गत सूक्ष्म, लघू, मध्यम, मोठे, विशाल व अति विशाल उद्योगांना प्रोत्साहने देण्यासाठी पात्रतेचे निकष नमूद करण्यात आले आहेत्. सदर निकषांतर्गत पात्र उद्योग घटकांना प्रोत्साहनाचे वाटप करण्यात येत असून त्याचा लाभ उद्योजक घेत आहेत.

ड) कृषीवर आधारीत व अन्न प्रक्रिया उद्योगांना सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत मोठ्या व विशाल प्रकल्पांसाठी विहीत गुंतवणुकीचे/ रोजगाराचे निकष व प्रोत्साहने दिनांक ३१/०८/२०२० च्या शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आली आहेत. सुधारीत निकषानुसार सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत एकत्रित प्रोत्साहने देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी राज्यामध्ये सुरु असून त्याचा लाभ कृषी व अन्न प्रक्रिया क्षेत्रातील उद्योजकांना होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासन अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४६) ९५४८ (१५-०७-२०२१) श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासन अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयामध्ये २७० पेक्षा अधिक अध्यापकांची विविध पदे मागील ६ वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे आयुर्वेद महाविद्यालयांना अनेक अडचणींना तोंड दयावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदरील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२३-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात फ्रंटलाईन वर्कर म्हणून काम करणारे हजारो शिक्षक लसीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(४७) ९५७९ (१८-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना प्रादुर्भावाच्या दुसऱ्या लाटेमध्ये ग्रामीण भागातील शिक्षकांना डॉक्टरांसोबत कामे नेमून देण्यात आली असून डॉक्टरांसह अन्य वैद्‌यकीय कर्मचाऱ्यांना “पीपीई” किट उपलब्ध करुन देण्यात आले असताना शिक्षकांना मात्र कोणतीही सुरक्षेची साधने दिली जात नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक जिल्ह्यात शिक्षक “पीपीई” किटशिवाय रूग्णालयात काम करीत असून रूग्णांच्या शरीराचे तापमान मोजणे, घरी विलगीकरणात असलेल्या रूग्णांना प्रत्यक्ष भेटी देवून सेल्फी काढणे, शिधावाटप दुकान, घरोघरी भेट देणे व नाकाबंदीच्या कामामध्ये शिक्षकांची नेमणूक करणे अशी अनेक कामे शिक्षकांना दिली असून (फ्रंटलाईन वर्कर) कोविड योध्दा म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांना आरोग्याच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नसतानाही राज्यातील २५ हजार शिक्षक आजमितीस लसीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शिक्षकांना सुरक्षेची साधने न देण्याची तसेच त्याचे लसीकरण न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागात कोणत्याही सुरक्षेच्या साधनाशिवाय डॉक्टरांसोबत काम करणाऱ्या शिक्षकांना विनाविलंब डॉक्टर व अन्य वैद्‌यकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सुरक्षेची साधने उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच, लसीकरण करण्याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्यवाह शिवनाथ दराडे यांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री आदींकडे लेखी निवेदनाद्‌वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०८-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार कोरोना लसीकरण करण्यात येत आहे. यामध्ये सर्वप्रथम प्राधान्य गटप्रमाणे लाभार्थ्यांना लसीकरण करण्याचे नियोजित केले होते. प्राधान्य गटा मध्ये हेल्थ केअर वर्कर्स, फ्रंट लाईन वर्कर्स यांचे लसीकरण सुरु करण्यात आले होते.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कोविडशी संबंधित कामकाज हाताळणाऱ्या शिक्षकांचे फ्रंट लाईन वर्कर या संवर्गात नोंदणी करुन त्यांचे लसीकरण करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) सदर निवेदन शासन स्तरावर अद्याप प्राप्त झालेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संजय गांधी निराधार (ता.डहाणू, जि.पालघर) योजनेंतर्गत पात्र योजनेचा लाभ मिळून अनुदान प्राप्त होण्याबाबत

**(४८) ९६०७ (१७-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. तवा, धामटणे,दहयाळे, ओसारवीरा, धानिवरी, रानशेत, शेलटी, निकणे, पिंपळशेत, साये, ऊर्से, म्हसाड, दाभोण, रणकोळ, रयतळी गोवणे, वनई (ता.डहाणू, जि.पालघर) आदि गावातील विधवा, घटस्फोटीत, अपंग

इत्यादी वंचितांनी संजय गांधी निराधार योजनेंतर्गत पात्र योजनेचा लाभ मिळण्यासाठी तहसिलदार, डहाणू यांचे कार्यालयात अर्ज सादर केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांनी अर्ज सादर करुन १० महिन्यापेक्षा अधिक कालावधी होऊनही आदिवासी भागातील या लाभार्थ्यांना अद्याप अनुदान वितरित करण्यात आले नसल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्यांच्या अनुदानाची रक्कम महिन्याच्या ३० तारखेच्या आत त्यांचे बँक खात्यात शासनामार्फत जमा केली जाते हे लक्षात घेता त्यांची अनुदान रक्कम रक्कम वितरित न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने पालघर जिलह्यातील तालुक्याचा आढावा घेऊन वंचितांना संजय गांधी निराधार योजनेंतर्गत पात्र योजनेचा लाभ मिळून अनुदान प्राप्त व्हावे याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२२-०९-२०२१) :** (१) डहाणू तालुक्यात विशेष सहाय्य योजनेकरीता माहे ऑगस्ट, २०२० ते मार्च २०२१ या कालावधीत एकूण १८५१ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १६५१ अर्ज मंजूर, १५१ नामंजूर तर उर्वरीत अर्ज कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी प्रलंबित आहेत.

(२) व (३) डहाणू तालुक्यातील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य माहे मे, २०२१ पर्यंत लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## फयान व निसर्ग चक्रीवादळाच्या धर्तीवर 'तौक्ते' चक्रीवादळामुळे क्षतीग्रस्त झालेल्या व मृत झालेल्या मच्छिमारबांधवांना व आपदग्रस्ताना तातडीने आर्थिक मदत मिळण्याबाबत.

**(४९) ९८५३ (१४-०६-२०२१) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.विलास पोतनीस : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ४५३५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरबी समुद्रातील 'तौक्ते' चक्रीवादळाने मुंबईच्या किनारपट्टीसह रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर या जिल्ह्यातील मच्छिमार बांधवांच्या सुमारे ४७६ मासेमारी नौकांचे आणि साहित्याचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असल्याची चिंताजनक बाब दिनांक २२ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वादळामुळे मुंबईत १५ मच्छिमार बोटी समुद्रात बुडाल्या असून ९३ बोटींचे मोठ्या प्रमाणात नुकसान व २ मच्छीमार बांधवांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'तौक्ते' चक्रीवादळामुळे नुकसानग्रस्त झालेल्या मच्छीमार बांधवांच्या नौका व साहित्यांचा पंचनामा शासनाने केला आहे काय, निसर्ग चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या पालघर, रायगड व रत्नागिरी जिल्हयांना एक विशेष बाब म्हणून राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या (SDRF) निकष व दरांमध्ये तसेच मत्स्य व्यवसायिकांच्या बोटींच्या झालेल्या नुकसानी पोटी मदतीत वाढ करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, फयान व निसर्ग चक्रीवादळाच्या धर्तीवर 'तौक्ते' चक्रीवादळामुळे क्षतीग्रस्त झालेल्या व मृत झालेल्या मच्छिमारबांधवांना व आपदग्रस्ताना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (३०-०९-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) तौक्ते वादळात मत्स्य व्यवसायिकांचे बोटी, जाळी, मत्स्यबीज शेतीचे झालेल्या नुकसानीबाबत “निसर्ग” चक्रीवादळाच्या धर्तीवर मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला असून रुपये १२३७.७५ लक्ष इतका निधी दिनांक २३/०६/२०२१ रोजी विभागीय आयुक्त, कोकण यांना वितरीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात वन विभागात वनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवीधारकांसाठी राखीव जागा ठेवण्याबाबत

**(५०) ९९१७ (१५-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन विभागातील सहाय्यक वन संरक्षक, वन क्षेत्रपाल आणि वन रक्षक या संवर्गातील पदावर वनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवीधारकांसाठी राखीव जागा ठेवण्याचा प्रस्ताव तातडीने शासनास सादर करण्याचे निर्देश मा.वने राज्यमंत्री महोदयांनी दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यास वन विभागातील सरळसेवा भरतीत वनशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना गट-अ व गट-ब साठी १० टक्के आणि गट-क साठी ५ टक्के लाभ मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे थोडक्यात स्वरुप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२१-०९-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) सहाय्यक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल संवर्गात १०% तसेच वनरक्षक/वनपाल संवर्गात वनशास्त्र पदवी धारकांसाठी ५% आरक्षण प्रस्तावित असून त्यानुसार या पदांच्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्याची बाब कार्यवाहीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.